# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०१/२०२६ (शुक्रवार )**

## नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी सन २०२५ मध्ये सन २०२४ च्या तुलनेत आरोपीवर प्रतिबंधात्मक कारवाई तसेच अवैध धंद्यावर अतुलनीय कारवाई करून कामगिरीचा आलेख उंचावला

मा.श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के ,अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी अवैध धंदयातील गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या असुन नागपुर ग्रामीण पोलीसांनी सन २०२५ मध्ये अवैध धंद्यांवर केलेली कारवाई सन २०२४ च्या तुलनेत अधिक प्रभावी ठरली आहे. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाया, हद्दपार, एमपीडीए, मकोका, अवैध हत्यारे, अवैध दारू, अवैध जुगार, अवैध अंमली पादार्थ आणि प्रतिबंधित सुगंधित तंबाखू या संबंधीच्या गुन्ह्यांवर कठोर कारवाया करण्यात आल्या आहे.

सन २०२४ मध्ये कलम १२६ भानासुसं अन्वये ५६९ प्रतिबंधात्मक कारवाया नोंदवल्या गेल्या असताना, सन २०२५ मध्ये तब्बल १४९६ कारवाया केल्या गेल्या. **( १६३ टक्कयांनी वाढ झाली )** कलम १२९ भानासुसं अन्वये १६४४ प्रतिबंधात्मक कारवाया नोंदवल्या गेल्या असताना, सन २०२५ मध्ये १९६५ कारवाया केल्या गेल्या. **(२० टक्कयांनी वाढ झाली )** तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयात प्रतिबंधक कारवाई बंधपत्राचे उल्लंघन केलेले सन २०२४ मध्ये ८५ प्रकरण प्राप्त होते. १,१६००/— रूपयांचा दंड वसुल करण्यात आला. सन २०२५ मध्ये २०१ प्रकरण प्राप्त असुन आरोपीतांवर बंधपत्र उल्लंघनाबाबत कार्यवही करून मा. अपर पोलीस अधिक्षक यांचे कोर्टातुन तब्बल २३,६६,२००/— रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे हद्दपार आरोपीतांची संख्या ४२ वरून १०६ वर गेली, तर एमपीडीए अंतर्गत सन २०२४ मध्ये ०६ आरोपीतांना तर सन २०२५ मध्ये २४ आरोपीतांना स्थानबध्द करण्यात आले आहे. सन २०२५ मध्ये संघटित गुन्हेगारी करणाऱ्यां आरोपीतांच्या **७ टोळयांमधील एकुण ४३ आरोपींवर** महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

अवैध अंमली पदार्थ सेवन तसेच तस्करी तसेच विक्री करणाऱ्यांवर सन २०२४ मध्ये एनडीपीएस कायदयान्वये ७५ गुन्हे तर सन २०२५ मध्ये तब्बल ८६२ गुन्हयांची नोंद करण्यात आली आहे. सन २०२४ मध्ये मपोका १२२ चे ८० गुन्हे तर मपोका १२४ चे ०६

गुन्हे नोंदविले होते. सन २०२५ मध्ये मपोका १२२ चे ९० गुन्हे तर मपोका १२४ चे ४४ गुन्हे नोंदविले होते. सन २०२४ मध्ये प्रतिबंधित सुगंधित तंबाखू/गुटखा बाबत ३८ गुन्हे दाखल असुन सन २०२५ मध्ये ४७ गुन्हे दाखल करण्यात आले असुन **२ कोटी ४१ लाखांचा मुद्देमाल** जप्त करण्यात आला. **( गुन्हे दाखल २७ टक्कयांनी वाढ )**. सन २०२४ मध्ये अवैध अग्नि शस्त्रांबाबत १९ गुन्हे नोंद असुन सन २०२५ मध्ये २१ गुन्हयांची नोंद करून १७ माउजर, ८ देशी कट्टे , ३ एअर गन आणि ५७ काडतुसे जप्त करण्यत आले. सन २०२४ मध्ये अवैध दारू बाबत ४,३३१ गुन्हे दाखल तर सन २०२५ मध्ये ४,७१२ गुन्हे दाखल असुन **४ कोटी १५ लाखांचा मुद्देमाल** जप्त करण्यात आला.**( गुन्हे दाखल ९ टक्कयांनी वाढ ).** सन २०२४ अवैध जुगार खेळणाऱ्या २०३२ आरोपींवर कारवाई केली सन २०२५ मध्ये २१७८ आरोपींवर कारवाई करून **३ कोटी ५५ लाखांचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**नागपुर ग्रामीण पोलीसांची अवैध धंद्यांवर अशीच कारवाई सुरू राहील. नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी संशयास्पद हालचालींबाबत तसेच अवैध धंदयांबाबत तात्काळ पोलीसांना माहिती द्यावी.**

## नागपूर ग्रामीण पोलीसांनी 'रेझिंग डे' निमीत्ताने घेतले विविध कार्यक्रम

**२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र राज्य पोलिस दलाच्या स्थापनेचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र सरकारने हा दिवस अधिकृतरित्या पोलिस रेझिंग डे म्हणून घोषित केला असून, दिनांक ०२ ते ०८ जानेवारी पर्यंत रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. आज दिनांक ०२/०१/२०२६ रोजी नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे रेझिंग डे' विविध उपक्रम घेवुन साजरा करण्यात आला. नागपूर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस रेझिंग दिनानिमित्य विविध शाळांमध्ये जावुन कार्यक्रम राबविले. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनचे कामकाजा विषयी माहिती , गुन्हेविरोधी जागरूकता, सायबर गुन्हे, गुड टच बॅड टच, रस्ते सुरक्षाबाबत माहीती देण्यात आली. पोलीसांचा जनतेशी संपर्क वाढावा तो अधिक दृढ व्हावा असे सदर उपक्रम आयोजन करण्यामागचा उद्देश आहे.**

पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत जनता हायस्कुल येथे, पोलीस स्टेशन बेला अंतर्गत विमलबाई तिडके विदयालय येथे, पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत अरविंद इंडो पब्लीक स्कुल आणि बनारसी दास रूइया शाळा येथे, पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत साईबाबा आदिवासी निवासी आश्रम शाळा येथे, पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत लाखोटीया भुतडा हायस्कुल येथे, पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत नगर परिषद शाळा येथे, पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत शिर्डी साई पब्लिक स्कुल येथे,पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत जीवन विकास विदयालय उमरेड येथे, पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत संस्कृती किसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय बुटीबोरी येथे, पोलीस स्टेशन कुही अंतर्गत संतोषराव रडके

हायस्कुल सिल्ली येथे ,पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत भिकुलाल चांडक शाळा येथे, पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत नरेंद्र तिडके महाविदयालय येथे, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत न्यु प्रेरणा कॉन्व्हेंट येथे ,पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत विवेकानंद कनिष्ठ महाविदयालय येथे, पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत समर्थ रामदास हायस्कुल येथे , पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत सेंट फ्रॅसिक्स स्कुल येथे, पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत के.डी.के. इंटरनॅशनल स्कुल येथे जावुन तेथील शालेय विदयार्थ्यांना पोलीस स्टेशनचे दैंनदिन कामकाजाबाबत माहीती देण्यात आली. तसेच वाहतुक नियम, सोशल मिडीया चा वापर तसेच सायबर गुन्हयांबाबत माहीती, डायल ११२ माहीती देवुन जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

## विदयार्थ्यांची पोलीस स्टेशनला भेट

पोलीस स्टेशन खापा येथे जवाहर विदयालय खापा चे विदर्थ्यांना तसेच पोलीस स्टेशन वेलतुर येथे जि.प. उच्च प्राथमिक शाळा, वेलतुर चे विदर्थ्यांना आंमत्रित करून शाळेतील विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनची रचना आणि कामकाजा विषयी तसेच पोलीस स्टेशन मधील विविधी शस्त्रे दाखवुन त्या विषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमास विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते. पोलीस स्टेशर पारशिवणी येथे, ग्राम सुरक्षा दल सदस्य, पोलीस मित्र, पोलीस पाटील यांची बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये पोलीस स्थापना दिवस (रायझिंग डे) निमित्त पोलीस विभागाबाबत माहिती देऊन पोलीस विभागाची कार्यपद्धती समजावून सांगितली. सदर बैठकीत रस्ते सुरक्षा,सायबर सुरक्षा, बाबत माहिती देण्यात आली.

## जिल्हा वाहतुक शाखा नागपूर शाखे कडुन घेण्यात आलेले कार्यक्रम

पोस्टे बोरी अंतर्गत श्रीकृष्ण हायस्कूल सावंगी असोला येथे, पोस्टे काटोल अंतर्गत अरविंद इंडो पब्लिक स्कूल काटोल येथे, पोस्टे खापा अंतर्गत जवाहर विद्यालय खापा येथे, पोस्टे भिवापूर अंतर्गत प्रियवंदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सालेशेरी त. भिवापूर येथे रेझिंग डे निमित्त वाहतूक नियमन, वाहतूक कारवाई तसेच रस्ता सुरक्षा बाबत माहिती देण्यात आली. पोस्टे कन्हान अंतर्गत रेझिंग डे निमित्त वाहन चालकांना वाहतुक नियमाबाबत मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली. पोस्टे रामटेक अंतर्गत खुमारी टोल नाका येथे रेझिंग डे निमित्त वाहन चालकांना वाहतुक नियमाबाबत मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली.


महाराष्ट्र पोलीस
वर्धापन दिन
दि. २ जानेवारी ते ८ जानेवारी
पोलीस स्टेशन,भिवापुर नागपुर (ग्रामीण)
आपले सहर्ष स्वागत करित आहे






पोलीस स्टेशन, कळमेश्वर
HAPPY
POLICE RISING
DAY-2026


अपना सुधार संसार की
सबसे बड़ी सेवा है।


पोलीस स्टेशन वेलतूर
जिल्हा- नागपूर (ग्रामीण)
दुरध्वनी क्र. 07100-223434
पोलिस स्टेशन, वेलतूर
नागपूर (ग्रामीण) नागपूर



## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०६ गुन्हे नोंद

दिनांक ०१/०१/२०२६ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, तसेच इतर साहीत्य असा एकुण **४८४०**/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन रामटेक येथे एकुण ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापुर येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ०६ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत २३४० मिली देशी दारू, ८४ लीटर मोहाफुल दारू तसेच इतर साहीत्य असा एकुण ४,८४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने